महसूल संवर्ग बदलीबाबत....
डॉ.तेजस्विनी पाटील, दंतशल्यचिकित्सक,
सामान्य राज्य सेवा, गट-ब

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः मसंब-२०१८/प्र.क्र.३२०/सेवा-१
गोकुळदास तेजपाल रूग्णालय इमारत संकुल, ८ वा मजला,
लोकमान्य टिळक मार्ग, मंत्रालय, मुंबई-४०० ००१.
दिनांक :- १२ जून, २०१९.

शासन निर्णय:-

महाराष्ट्र शासकीय गट-अ व ब (राज्यपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसुली विभाग वाटप नियम, २०१५ अधिसूचना दि. २८.०४.२०१५ मधील नियम १२ अन्वये विहीत कारणांसाठी महसूली संवर्ग बदल करण्याकरिता त्या अधिनियमातील नियम १३ नुसार प्रशासकीय विभाग सक्षम आहे. डॉ.तेजस्विनी पाटील, दंतशल्यचिकित्सक, यांची सरळसेवेने क्र.संआसे २०१७/प्र.क्र.३/सेवा-१, दि.०२.१२.२०१७ रोजीच्या शासन आदेशान्वये औरंगाबाद विभागीय संवर्गामध्ये ग्रामीण रूग्णालय,परतूर जि.जालना येथे पदस्थापना झाली आहे. तथापि, डॉ.तेजस्विनी पाटील, दंतशल्यचिकित्सक यांनी केलेल्या विनंतीनुसार त्यांची पुढे दर्शविल्याप्रमाणे महसूली संवर्ग बदली करण्यात येत आहे.

अ.क्र.	**अधिकाऱ्यांचे नाव व पदनाम**	**वाटप करण्यात आलेला महसूली संवर्ग**	**सध्याची पदस्थापना**	**बदली करून देण्यात आलेला महसूली संवर्ग**	**बदलीने करण्यात आलेली पदस्थापना**
१.	डॉ.तेजस्विनी महादेव पाटील, दंतशल्यचिकित्सक	औरंगाबाद	ग्रामीण रूग्णालय परतूर जि.जालना	पुणे	ग्रामीण रूग्णालय, पलूस, जि.सांगली

२. बदली करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांना त्यांच्या पदस्थापनेच्या ठिकाणी हजर होण्याकरीता तात्काळ कार्यमुक्त करण्यात यावे व बदली झालेल्या अधिकाऱ्यांनी त्यांना दिलेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी त्वरीत हजर व्हावे. बदली झालेले अधिकारी हे रूजू/कार्यमुक्त झाल्याबाबतचा अनुपालन अहवाल, त्यांना रुजू करुन घेतलेल्या / कार्यमुक्त केलेल्या अधिकाऱ्याने तात्काळ संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांना सादर करावा व संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांनी शासनास सादर करावा.

३. बदली झालेल्या अधिकाऱ्यांची कोणत्याही प्रकारची रजा मंजूर करण्यात येऊ नये, अन्यथा रजा मंजूर करण्याऱ्या सक्षम प्राधिकाऱ्यावर जबाबदारी निश्चित करण्यात येईल.

४. बदली झालेल्या अधिकाऱ्यांनी त्यांना कार्यमुक्त केल्यानंतर, अनुज्ञेय पदग्रहण अवधीत त्यांनी नवीन पदस्थापनेवर रूजू व्हावे. जे अधिकारी या कालमर्यादेचे पालन करणार नाहीत आणि पदस्थापनेच्या ठिकाणी हजर न होता परस्पर गैरहजर राहतील, अशा अधिकाऱ्याची अनुपस्थिती "अनधिकृत अनुपस्थिती" म्हणून समजण्यात येईल व पर्यायाने त्यांच्या सेवेत खंड पडण्याची शक्यता नाकारता येत नाही याची जाणीव सर्व संबंधितांना करून देण्यात येत आहे.

५. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांनी जे अधिकारी त्यांच्या पदस्थापनेच्या ठिकाणी विहित कालावधीत हजर होणार नाहीत त्यांचे विरूध्द वेळीच प्रशासकीय कारवाई सुरू करावी, जेणेकरून अधिकारी वेळेच नवीन पदस्थापनेवार हजर होतील.

६. विनंतीने बदली झालेल्या अधिकाऱ्यांना पदग्रहण अवधी / प्रवासभत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

७. प्रस्तूत प्रस्ताव महाराष्ट्र शासकीय गट-अ व ब (राज्यपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसुली विभाग वाटप नियम, २०१५ अधिसूचना दि. २८.०४.२०१५ मधील नियम १२ अन्वये विहीत केलेल्या कारणांतर्गत येत नसल्याने सदर प्रस्तावास मा.मुख्यमंत्री यांची मान्यता घेण्यात आली आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०५३०१२३७२६२७१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ravindra Raghunath Gadhari

Digitally signed by Ravindra Raghunath Gadhari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9668226de60c3cc5b8ccd56833c07d32831e4140f3de291d1f40d510d295643f, serialNumber=8f564edcac5a4c4a79542e69f18152eb1ab86474731f4ac3d8424b8b56a653e1, cn=Ravindra Raghunath Gadhari
Date: 2019.06.18 18:20:18 +05'30'

(र. र. गढरी)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, आरोग्य सेवा तथा संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
२. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
३. सह संचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन), मुंबई.

४. उप संचालक, आरोग्य सेवा,औरंगाबाद/ कोल्हापूर.
५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना/सांगली.
६. जिल्हा शल्य चिकित्सक, जालना/सांगली.
७. जिल्हा कोषागार अधिकारी, जालना/सांगली
८. निवडनस्ती - सेवा-१.